सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.

विद्यानगरी, देवपुर , धुळे - 424 005.फोन :- 02562-272103 (कार्या.) Website-www.gpdhule.org.in

Email : principal.gpdhule@dtemaharashtra.gov.in , stores.gpdhule@dtemaharashtra.gov.in

जा.क्र :-शिमदाराशांतनिधु/के.भांडार/भंगार+रद्दी अंतिम विल्हेवाट /2024-25-R / 1477 दिनांक :- 2 AUG 2024

## निविदा सुचना

शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे या संस्थेतील रद्दी व भंगार 'आहे त्या स्थितीत' खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निविदा पद्धतीद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. त्याकरीता ईच्छुक खरेदीदारांनी आपल्या जास्तीत जास्त दराच्या निविदा या संस्थेत विहीत कालावधीत सादर कराव्यात.

## अटी व शर्ती यांचा तपशिल खालील प्रमाणे

- ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या सिलबंद निविदा या कार्यालयात -आवक/ जावक नोंदणी विभागात दि.२६.०८.२०२४ रोजी सायं ५ :०० वाजे पर्यंत सादर कराव्यात. संस्थेत उशिराने प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- उल्लेखित रद्दी व भंगाराची पाहणी दि.26.08.2024 पर्यंत सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळ सकाळी ११:०० ते संध्याकाळ ०४:०० वाजे पर्यंत राहील. यासंबंधी जास्तीची माहीती आवश्यक असल्यास या संस्थेचे भांडार अधिकारी / भांडारपाल यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.
- प्राप्त निविदा संस्थेतील गठीत समिती द्वारे दि. २७.०८.२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील.
- ईच्छुक खरेदीदारांनी निविदा सोबत Firm चे Registration copy , GST Registration Certificate व PAN Card च्या छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा निविदा विचारात घेण्यात येणार नाहीत .
- निविदा दस्तऐवजाच्या प्रत्येक पृष्ठावर ईच्छुक खरेदीदाराची स्वाक्षरी केलेली असावी. अपुर्ण किंवा स्वाक्षरी नसलेले निविदा नाकारल्या जातील.
- निविदा या कार्यालयात सादर केल्यानंतर त्यातील दरामध्ये फेरफार करता येणार नाही.
- निविदेतील दर्शविलेली किंमत ही भंगार/रद्दी व वाहतुक खर्च / लोडींग/ कामगार शुल्क इतर सर्व खर्चासह समावेश असणे आवश्यक आहे.
- ईमेलद्वारे पाठविलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
- सर्वाधिक किंमतीच्या निविदेदारास विक्री आदेश संस्थेमार्फत दिला जाईल. सदर सर्व भंगार/रद्दी स्वखर्चाने या संस्थेतुन 'आहे त्या स्थितीत' खरेदी करणे आवश्यक राहील . तसेच किमान बाजारभावाप्रमाणे एवढे अथवा त्यापेक्षा जास्त दराने किंमत न आल्यास विक्री प्रक्रीया रद्द करण्यात येईल.
- विक्री केलेल्या सर्व भंगार/रद्दी वितरण करण्यापुर्वी संबधित विभागामार्फत पडताळणी केली जाईल व तसेच रद्दी /भंगारचे वजन हे संस्थेतील गठीत समिती समक्ष केले जाईल व त्यानुसार निवड झालेल्या खरेदीदाराने त्वरीत कार्यालयात विक्रीची एकुण रक्कम 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे नावे DD/ RTGS द्वारे भरावे लागतील. सदर विक्रीची एकुण रक्कम 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे खात्यावर जमा झाल्यावर व तसे याबाबत लेखा विभागाकडुन भंगार विक्री रक्कमेची पावती भांडारास प्राप्त झाल्यावर संबधित खरेदीदाराला गेट पास द्वारे भंगार/रद्दी संस्थेतून बाहेर नेता येईल.

**Name :- Principal Government Polytechnic, Dhule**
**Account number :- 11194931593, IFSC Code :- SBIN0008254**

- भंगार/रद्दीचे आदेशान्वये 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे'यांचे खात्यावर संपुर्ण विक्री रक्कम जमा झाल्यापासुन ०३ दिवसाच्या आत सदर भंगार/रद्दी लोडींग करणे आवश्यक राहील , दरम्यान त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही व तसेच लोडींग करतांना , वाहतुकी दरम्यान कोणतीही अनुचित घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी किंवा भरपाई करण्याची संस्थेवर राहणार नाही.
- संस्थेतील विक्री करण्यात आलेले भंगार/ रद्दी मालाची निवड/ वर्गीकरण/वेल्डींग /कटींग इ. प्रक्रीया संस्था परिसरात करण्याची परवानगी राहणार नाही.
- महाराष्ट्र शासनाचे या संबधातील सर्व नियम व कायदे सर्व ईच्छुक खरेदीदारांनी /भंगार विक्रेत्यांना लागु व बंधनकारक असतील.
- सदर भंगार/रद्दी विक्री प्रक्रीया पुर्व सुचना न देता मंजुर करणे/नामंजुर करणे/तहकूब करणे/रद्द करणे /निविदा स्वीकारण्याचे-नाकारण्याचे कोणत्याही कारणास्तव काही कारण न देता इ.बाबतचे संपुर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीकारांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

| Sr.no | Type of Waste papers and Scrap for disposal | Qty of Waste papers(Raddi) and scrap (Bhangar) (in Kgs) | NAME OF DEPT. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | FILES (PAPER WASTE (RADDI) | 223.1KGS | AE+SCI.+CO |
| 2 | MANUALS (PAPER WASTE (RADDI) | 563.2KGS | AE+APM+SCI+CO+WS |
| 3 | TEST PAPERS (PAPER WASTE/RADDI) | 124.2KGS | AE+ME+SCI+CO |
| 4 | DRAWING SKETCH BOOKS/SHEETS (PAPER WASTE (RADDI) | 21.5KGS | AE+ME |
| 5 | NEWSPAPERS (PAPER WASTE/RADDI) | 276KGS | LIBRARY |
| 6 | PACKING BOXES (PAPER WASTE/RADDI) | 37KGS | AE |
| 7 | STUDENTS NOTE BOOKS (PAPER WASTE/RADDI) | 83KGS | CO |
| 8 | M.S.STAND /M.S.HOOKS OLD STUDENT JOB SCRAP | 89KGS | WS |
| 9 | G.I.TRAY BIG SIZE OLD STUDENTS JOB (SCRAP) | 30 KGS | WS |
| 10 | G.I.TRAY SMALL SIZE OLD STUDENTS JOB (SCRAP(BHANGAR) | 14 KGS | WS |
| 11. | M.S.SCRAP (BHANGAR) | 150 KGS | HOSTEL |

(डॉ.आर.जी.वाडेकर)
प्राचार्य,
शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकिय तंत्रनिकेतन,धुळे.

प्रत माहीतीकरिता सविनय सादर :-

1.)मा.संचालक सो,तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य ,3, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्रमांक 1967,मुंबई -400 001- यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

2.)मा.सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , शासकीय तंत्रनिकेतन परिसर सामनगांवरोड, नाशिक रोड,नाशिक - 422 101 -यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

3.)विभाग प्रमुख,संगणक, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना - संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव.

4.)विभाग प्रमुख - संगणक / यंत्र/स्वयंचलन /वसतिगृह/सायन्स /उपयोजित यंत्रशास्त्र/कर्मशाळा/ग्रंथालय - शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.-यांना माहितीस्तव - इमेल द्वारे

5.)कार्यालय विभाग, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना माहीतीस्तव व मुख्य सुचना फलकावर प्रदर्शिक करणेस्तव.